| MHBI170001152022 | **<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१४/२०२२</u>**<br>चैतन्या वि. ज्ञानेश्वर<br>-------------------------<br><u>निशाणी क्र.२० खालील आदेश</u><br>(दिनांक ०१/०४/२०२६) |
|---|---|

१. प्रस्तुत प्रकरण हे पोटगीची थकित रक्कम वसुल करुन मिळणे बाबत दाखल केलेले असून प्रस्तुत अर्ज उर्वरित थकित रक्कम रू.१,५४,०००/– वसुल होण्याकरीता गैरअर्जदार यांच्या विरुद्ध पकड वॉरंट काढण्यात यावे या करीता दाखल केला आहे.

२. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, गैरअर्जदार हे दिनांक २१.०१.२०२३ रोजी स्वतः न्यायालयासमोर हजर झालेले असून त्या करीता त्यांनी पुरसिस (नि.क्र.१३) दाखल केलेली आहे, परंतु त्यांनी आज पर्यंत कोणत्याही विधीज्ञांची नियुक्ती केलेली दिसून येत नाही. आज रोजी दुपारी ३.५५ पर्यंत गैरअर्जदार यांचा वारंवार पुकारा केला असता ते न्यायालयासमोर हजर झाले नाहीत.

३. अभिलेखावर अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, दिनांक ०९.०२.२०२३ रोजी दाखल केलेला अर्ज (नि.क्र.१४) वर दिनांक १०.०५.२०२३ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार गैरअर्जदार यांच्या विरुद्ध रिकव्हरी वॉरंट काढण्याचा आदेश झालेला आहे. त्या अनुषंगाने दिनांक ११.०५.२०२३ रोजी जप्ती व विक्री करुन पोटगीची रक्कम वसुल करण्यासाठ निर्गमित करण्यात आलेले वॉरंट अभिलेखावर दाखल आहे. अभिलेखावर दाखल असलेला एन.बी.डब्लू. तामीलीबाबतचा रिपोर्ट (नि.क्र.१५) दिनांक २५.०५.२०२३ चे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, गैरअर्जदार यांच्या विरुद्ध जप्ती आणि विक्री करुन वसुली होण्याकरीता वॉरंट निर्गमित केले असताना गैरअर्जदार यांना पकडुन न्यायालयासमोर हजर करण्यात आलेले आहे. थोडक्यात असे दिसून येत आहे की, जप्ती आणि विक्री करुन पोटगीची रक्कम वसुल करण्यासाठी निर्गमित केलेल्या वॉरंटची (डी.डब्लू.) बजावणी झालेली दिसून येत नाही.

४. जप्ती आणि विक्री करुन पोटगीची रक्कम वसुल करण्यासाठी निर्गमित केलेल्या वॉरंटची (डी.डब्लू.) रितसर बजावणी झाल्याशिवाय गैरअर्जदार यांच्या विरुद्ध थेटपणे अटक वॉरंट काढणे कायद्याच्या चौकटीत बसत नाही. सबब, पुढील आदेश पारित करण्यात येतो ;

**<u>आ दे श</u>**

गैरअर्जदार यांच्या विरुद्ध पोटगीची वसुली होण्याकरीता जंगम मालमत्तेची जप्ती आणि विक्री करुन वसुली होण्याकरीता वॉरंट (**D.W.**) निर्गमित करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2026.04.01 16:39:43 +0530

**दिनांक : ०१/०४/२०२६.** **( विष्णु द. गिते )**
**ठिकाणः वडवणी.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वडवणी,**
**जि. बीड.**

## <u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. विष्णु द. गिते,**<br>दिवाणी व फौजदारी न्यायालय,<br>वडवणी, जि. बीड. |
| लघुलेखकाचे नाव | :– | राजेश आर. कुलकर्णी |
| घोषित दिनांक | :– | ०१/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | ०१/०४/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | ०१/०४/२०२६ |